# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.४२/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ६ सप्टेंबर, २०१७

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई, पुणे, नागपूर व कोल्हापूर महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिका पोटनिवडणूक ऑक्टोबर, २०१७
प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम.
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.२५/०७/२०१७ व दि.६/९/२०१७ ची पत्रे.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालील ४ महानगरपालिकांमधील ५रिक्त पदाची पोटनिवडणूक घेण्याकरिता मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | नागपूर | ३५-अ |
| २ | कोल्हापूर | ११ व ७७ |
| ३ | बृहन्मुंबई | ११६ |
| ४ | पुणे | २१-अ |

२. आता या पत्रान्वये उपरोक्त रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम परिशिष्ट-१ प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता निवडणूक होणाऱ्या संबंधित प्रभागात लागू राहील. मात्र या प्रभागातील

मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

३. महानगरपालिकेची प्रभाग रचना तसेच मतदार यादीसंदर्भात विविध न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच मा. न्यायालयाचे कोणत्याही रिट याचिकेमध्ये स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात यावा व त्याबाबत आयोगास अवगत करण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट-१

प्रत :-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
५) प्रधान सचिव(२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे व नागपूर विभाग.
८) जिल्हाधिकारी, पुणे, नागपूर व कोल्हापूर.
९) पोलिस आयुक्त / जिल्हा पोलिस अधिक्षक, बृहन्मुंबई, पुणे, नागपूर व कोल्हापूर.
१०) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४
११) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१२) सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१३) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१४) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१५) निवड नस्ती (का.५), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा २०१७/प्र.क्र. ४२ /का.५, दि. ०६/०९/२०१७ सोबतचे

परिशिष्ट-१

## नागपूर (३५-अ), कोल्हापूर (११ व ७७), बृहन्मुंबई (११६) व पुणे (२१-अ) या महानगरपालिकांमधील रिक्त पदांची पोटनिवडणूक- ऑक्टोबर,२०१७

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | १६/०९/२०१७ (शनिवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी | १६/०९/२०१७ (शनिवार) सकाळी ११.०० ते २३/०९/२०१७ (शनिवार) दु.२.०० पर्यंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी | १६/०९/२०१७ (शनिवार) ते २३/०९/२०१७ (शनिवार) (सकाळी ११.०० ते दु.३.००) **(रविवार, दि.१७/०९/२०१७ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.)** |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | २५/०९/२०१७ (सोमवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | २७/०९/२०१७ (बुधवार) (दुपारी ३.०० पर्यंत) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | २८/०९/२०१७ (गुरुवार) (सकाळी ११.०० पासून) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २८/०९/२०१७ (गुरुवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | **११/१०/२०१७ (बुधवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत)** |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १२/१०/२०१७ (गुरुवार) (सकाळी १०.०० पासून) |
| ११ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | १३/१०/२०१७ (शुक्रवार) पर्यंत |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि.ज.वागळे)
अवर सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र